# रिटेल फायनान्स :-

## (३) प्रक्रिया सोसायटयांसाठी कर्जे -

### १) सहकारी साखर कारखाने कर्जधोरण -

१) साखर कारखाना कॅश क्रेडिट (पूर्व हंगामी/तात्पुरते कर्ज )

सहकारी साखर कारखान्यांना अल्पमुदत कर्ज पुरवठा करताना बिगर हंगामातील खर्चासाठी अल्प मुदत कर्ज (Short Term Loan for off seasonal expenses) हे एकाच प्रकारचे कर्ज खाते राखले जाईल, कर्जाची मुदत १ वर्ष पर्यंत राहील.

**पात्रता -**

१) सहकारी साखर कारखान्याचे नक्त मुल्य अधिक असावे.

२) सहकारी साखर कारखान्यांनी गत ३ वर्षातील घेतलेल्या पूर्व हंगामी अल्प मुदत कर्जाची मुदतीत अथवा मुदतीपूर्वी सव्याज परतफेड केलेली असावी.

३) पूर्वहंगामी कर्ज मंजूरीस पात्र कारखान्यांची पुरेशी बाहेरुन कर्ज उभारणी मर्यादा शिल्लक असावी व त्यांचेकडून सविस्तर कर्ज मागणी प्रस्ताव त्यांचे मा.संचालक मंडळाच्या ठरावासह सादर करावा.

४) बिगर हंगामी कालावधीसाठी मंजूर असलेल्या मर्यादा या राष्ट्रीय बँकेने निर्देशित केलेल्या एक्स्पोझर नॉर्मस इतपतच असतील.

५) ज्या सहकारी साखर कारखान्यांनी त्यांचे मालतारण कर्जखाते मर्यादेत ठेवले आहे. अशांनांच अल्प मुदत कर्जमर्यादा मंजूर केली जाईल.

### २) साखर कारखान्यांसाठी खेळते भांडवली कर्जधोरण :-

| | | |
|---|---|---|
| १ | धोरण कालावधी | सदर धोरणात कालानुरुप विशेष बदल संभवत नाहीत. त्यात होणारे बदल राष्ट्रीय बँकेकडून वेळोवेळी कळविले जातील त्यानुसार मा.कार्यकारी समिती/मा.संचालक मंडळ सभेच्या मान्यतेने बदल केले जातील. |
| २ | नक्तमूल्य (नेटवर्थ) | अधिक नेटवर्थ असलेल्या कारखान्यांना कर्जपुरवठा केला जावा. उणे नेटवर्थ असलेल्या कारखान्यांच्या बाबत राज्य शासनाची विनाअट थकहमी आवश्यक राहील. |
| | | नेटवर्थ काढताना कायम मालमत्तेचे फेर मुल्यांकन विचारांत घेतले जावू नये. |
| | | राज्य शासनाची विनाअट थकहमी प्राप्त झाली तरी उणे नेटवर्थ असलेल्या कारखान्यांच्या बाबतीत कर्जाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून आवश्यकतेनुसार जादा अटी घालण्यात येतील. |
| | | राष्ट्रीय बँकेच्या निकषानुसार सदर कर्ज पुरवठा सेक्टोरल आणि युनिट एक्स्पोजरच्या मर्यादेत राहील. |

| | | |
|---|---|---|
| ४ | ताबेगहाण कर्ज मर्यादा निश्चित करणे. | ज्या हंगामासाठी कर्ज मर्यादा निश्चित करावयाच्या आहेत , त्या हंगामातील कमाल संभाव्य साखर साठयाची मागील ३ महिन्यातील सरासरी साखरेचे दर विचारांत घेऊन येणा-या मुल्यांकन दरानुसार येणा-या रक्कमेइतपत ताबेगहाण कर्जमर्यादा निश्चित केली जाईल. |
| | | मर्यादेवरील उचली देताना संबंधित कारखान्याचा मासिक कॅश फ्लो विचारांत घेवून येणारी तूट व उचल पात्र रक्कम यापैकी किमान रकमेइतपत उचल दिली जावी. (ड्रॉईंग पॉवर ) |
| | | हंगामी आणि बिगरहंगामी कारखान्यांना स्वतंत्र मर्यादा त्या त्या वेळच्या धोरणानुसार ठरविता येतील. |
| ५ | नजरगहाण कर्ज मंजूरीचे निकष (स्टोअर माल आणि गणी बेल्ससाठी एकत्रित मर्यादा) | मागील ३ वर्षातील मर्यादेवरील कमाल वापर रक्कमेच्या १२०% किंवा कमाल रु.२.०० कोटी यामध्ये किमान असणारी रक्कम . |
| | | नजरगहाण मर्यादा कारखान्याकडील स्टोअर्स व गणीबेल्ससाठी मंजूर करण्यात येईल. |
| | | गणीबेल्सची डिलीव्हरी कारखाना साईटवर पोहोच झाल्याची खात्री झाल्यानंतरच उचल दिली जाईल. |
| ६ | नजरगहाण आसवणी प्रकल्प | आसवणी प्रकल्पाकडील मोलॅसेस आणि उत्पादित मालसाठयावर नजरगहाण कर्ज मंजूर केले जाईल. |
| ७ | दुरावा (मार्जीन) | अ) ताबेगहाण |
| | | १.कर्ज एक वर्षाच्या आतील कालावधीच्या साखरसाठयावर १५% दुरावा राहील. |
| | | २.एक वर्षाहून अधिक हंगामाचा साखरसाठा शिल्लक असल्यास प्रतिवर्ष ५% प्रमाणे दुरावा वाढविण्यात यावा. |
| | | ३. कमाल तीन वर्षाचा साखरसाठा विचारांत घ्यावा. |
| | | ब) नजरगहाण कर्जासाठी ४० % दुरावा राहील. |

**साखर कारखाना मध्यम मुदत कर्ज -**

साखर कारखान्याच्या मध्यम मुदत कर्ज प्रस्तावाबाबत बँकेचे पॅनेलवरील चार्टर्ड इंजिनिअर यांचा Techinical Economy Viable Report /Apprizal Report कर्ज पात्रतेसंबंधी सक्षमतेबाबतचा सविस्तर अहवाल इत्यादी कागदपत्रे घेऊन कर्जप्रस्ताव छाननी / मंजूरी अहवाल बाबत विचार करणेत येईल. सुतगिरण्यंना कर्ज मंजूर करताना आवश्यकतेनुसार तज्ञांमार्फत T.E.V रिपोर्ट घेतला जाईल.

- **सहकारी सुतगिरण्या कर्जधोरण -**

सहकारी सुत गिरण्यांची नोंदणी ही हातमाग, यंत्रमाग व सहकारी गिरणी संचालक, महाराष्ट्र राज्य यांचेमार्फत केले जाते. सदरचे प्रकल्प हे कमीत कमी २५००० चात्यांची असतात. आपल्या जिल्ह्यामध्ये कापड उद्योग हा कडेगांव, पलूस, तासगांव, आटपाडी, वाळवा या विभागामध्ये कार्यान्वित आहे. उत्पादीत सुताची माधवनगर, विटा व इचलकरंजी या स्थानिक बाजारपेठेत विक्री केली जाते. अशा प्रकारच्या सुत गिरण्यांना जिल्हा बँकेमार्फत खालील प्रकारची कर्जे मंजूर करणेचे धोरण आहे.